Leading International Marathi News Daily

लोकसत्ता
शनिवार, २० जून २००९




बाप 'माणूस'
एक गूढाचा प्रवास
पण बोलणार आहे!
नेति! नेति!
सक्षम मी
तडफदार!
विज्ञानमयी
प्रतिसाद
उपेक्षित फ्रेंच कादंबरीकार - फेझा ग्वेन
शिक्षण देता - घेता
फूड स्टायलिश
मुलांमध्ये रमणारे बाबा
'मायक्रो' कल्चर!
झाले मोकळे आकाश
चिकन सूप...
खरी ओळख
कवितेच्या वाटेवर...
स्पर्शानं हेलावणं
पंखांना बळ देताना...
ललित
पैल तोगे काऊ कोकताहे...
अदभुत!

Advertise with us







# विज्ञानमयी

## पी. मोहन्ती हेजमाडी

पी. मोहन्ती हेजमाडी हिने केवळ शास्त्रज्ञ म्हणूनच आपली कारकीर्द मर्यादित ठेवली नाही; तर अनेक क्षेत्रांमध्ये ती कार्यरत राहिली व यश मिळवलं. त्यासाठी तिला त्या-त्या क्षेत्रातील सन्मानही लाभले. भारत सरकारने तिला 'पद्मश्री' देऊन गौरवलं आहे. पर्यावरण क्षेत्रातील कामगिरीबद्दल तिला 'पितांबर पंत नॅशनल फेलोशिप', 'जस्टिस राजकिशोर मेमोरिअल अॅवॉर्ड' आणि 'प्राणकृष्ण परिजा अॅवॉर्ड' मिळाले आहे. त्याशिवाय ओडिसी नृत्यातील भरीव योगदानाबद्दल 'सेंट्रल संगीत नाटक अॅकॅडमी'चं अॅवॉर्ड आणि सारंगदेव फेलोशिप मिळाली आहे आणि 'इंडियन डेव्हलपमेंट बायोलॉजिकल'वर ती पहिली स्त्री-अध्यक्ष म्हणून निवडून आली व ओरिसा- संबळपूर युनिव्हर्सिटीचे कुलगुरूपदही (१९९५-१९९८) तिने भूषविले आहे.
पी. मोहन्ती हेजमाडी हिचा जन्म स्वातंत्र्यपूर्व काळातला. आई-वडील दोघेही सुशिक्षित आणि भारतीय स्वातंत्र्य आंदोलनातील

सक्रीय कार्यकर्ते. ती जात्याच बुद्धिमान होती. तिला तत्कालीन विचारवंत, बुद्धिमान स्त्रियांचा सहवास लाभला.
इंटर-सायन्सच्या परीक्षेतील गुणांवर तिला मेडिकलला सहज प्रवेश मिळाला असता. पण वय लहान असल्याने तिला बी.एस्सी करावं लागलं. प्राणिशास्त्र हा विषय तिला विशेष आवडल्याने त्यातच काम करीत रहावं असं तिनं ठरवलं. पुढे लखनऊला जाऊन तिने एम.एस्सी केलं आणि ओरिसात परतल्यावर तिथल्या उत्कल युनिव्हर्सिटीत नव्यानेच सुरू झालेल्या एम.एस्सी.च्या वर्गांना शिकवू लागली. तिथल्या ग्रंथलयात येणाऱ्या जर्नल्समधून तिने संशोधनाचा मार्ग चोखंदळला. पुढे तिला मिशिगन युनिव्हर्सिटीतून नार्कर फेलोशिप मिळाली आणि प्रवासखर्चासाठी फुलब्राइट ग्रँटही मिळाली. तेथे गेल्यावर तिला पुस्तकी पांडित्य आणि प्रयोगांनी मिळवलेले प्रत्यक्ष ज्ञान यातला फरक कळला.
शरीरविज्ञान, पेशीज्ञान आणि अनुवंशशास्त्र या तिन्ही दृष्टींतून बेडकाच्या अंडय़ावर पुष्कळ प्रयोग केले. 'अमेरिकन बेडूक राना पिपीन्स' याला मातेचे सिरम प्रोटिन्स (रक्तातील प्रथिने) दिले असता त्यांच्या वाढीवर होणारे परिणाम या विषयांवर तिने पीएच.डी. चा प्रबंध लिहिला. त्यानंतर ती पुन्हा उत्कल युनिव्हर्सिटीत परतली. भूजलचर व सापांमधील संरक्षणाची गरज असणाऱ्या जाती यांचा विशेष अभ्यास करण्यासाठी तिने एक स्वतंत्र प्रयोगशाळा उभारली. अंडय़ातून नुकतीच बाहेर पडलेली बेडकाची पिल्ले (Tadpoles) यांना व्हिटॅमिन ए दिले असता त्यांची वाढ भराभर होते. यावरील तिच्या प्रयोगाला पुष्कळ प्रसिद्धी मिळाली. आज ती निवृत्त झाली आहे. तरीही विज्ञानविषयाशी संबंधित लेखन सुरू आहे.

## जयश्री रामदास

जयश्रीचा जन्म मुंबईतला. पण तिच्या वडिलांची युनायटेड नेशन्समध्ये बदलीची नोकरी असल्याने बगदाद, अमेरिका अशा ठिकाणी शालेय शिक्षण झालं. पुढे अरब-इस्रायली युद्धानंतर अमेरिकन शाळा बंद पडली. म्हणून तिच्या आईने तिला पुण्यात सेंट हेलेना बोर्डिंग स्कूलमध्ये ठेवलं. अशा रीतीने तिला बालपणातच निरनिराळ्या वातावरणातील निरनिराळ्या शाळा, त्यांच्या निरनिराळ्या शिक्षणपद्धतींची ओळख झाली. पुण्याच्या शाळेत पदार्थविज्ञान 'ग्रेगरी, धोंड आणि इंगले' या एका क्रमिक पुस्तकावरूनच शिकवले जायचे. प्रात्यक्षिक जवळजवळ नव्हतेच!
जयश्रीला पदार्थविज्ञान आणि मानसशास्त्र हे एकमेकांशी फारसे संबंधित नसलेले दोन विषय फार आवडत. तिने पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. पण तिथले शिक्षणही पुस्तकीच होते. पुढे I.I.T. कानपूरला गेल्यावर तिथे शिकवलेल्या पदार्थविज्ञानाने ती फार प्रभावित झाली. पण तिथली गती आपल्या कुवतीपलीकडे आहे असं तिला वाटत राहिलं. एमएस्सीनंतरच्या सुटीत अभ्यासाची पुस्तकं सावकाशीनं वाचून तिने ती उणीव भरून काढली आणि म्हणाली, ''एक दिवस मी नक्कीच यापेक्षा चांगली क्रमिक (अभ्यासाची) पुस्तके लिहीन.''
१९७६ मध्ये ती मुंबईला T.I.F.R. च्या 'होमी भाभा सेंटर फॉर सायन्स एज्युकेशन' येथे काम करू लागली तेव्हा तिला शास्त्र, मानसशास्त्र आणि शालेय शिक्षणशास्त्र या तिच्या आवडत्या तिन्ही विषयांच्या समन्वयची संधी मिळाली.
या विषयांत पूर्वी कोणी फारसे काम केले नसल्यामुळे तिला तसे मार्गदर्शन नव्हते. परंतु H.B.C.S.E. मधील खुल्या वातावरणामुळे तिला आपल्या मनाप्रमाणे काम करता आले. महाराष्ट्रातील सर्व शाळांमधून शास्त्र हा विषय शिकविण्याच्या अभ्यासक्रमाच्या आराखडय़ापासून ते अगदी खेडय़ापाडय़ातल्या शाळांमध्ये प्रत्यक्ष सहभाग घेण्यापर्यंत तिने काम केले. तिथे तिच्या लक्षात आले, की शहरी शाळांमधून घोकंपट्टी करणाऱ्या मुलांपेक्षा खेडेगावातील मुले अनुभवातून अधिक चांगल्या पद्धतीने शिकतात. विशेष म्हणजे स्वत:च्या मातृभाषेत शिकणं ही सर्वात महत्त्वाची गोष्ट असल्यचे तिला जाणवले. तिच्या या कामात ती प्रा. व्ही. जी. कुलकर्णी यांचा विशेष आदराने उल्लेख करते.
कोणतेही शास्त्र शिकवताना 'शिकणाऱ्या मुलांच्या दृष्टिकोनातून त्याकडे पाहा,' यावरच तिचा भर आहे. H.B.C.S.E. चे संचालक अरविंदकुमार यांच्या सूचनेप्रमाणे तिने अभ्यासक्रमात उल्लेखनीय सुधारणा करण्याचे काम स्वीकारले आहे. त्याला शिक्षण व पालक यांच्याकडून उत्तम प्रतिसाद मिळत आहे. आजही तिला ही रूखरूख लागून राहिलीय, की शाळा-कॉलेजात अभ्यासक्रमाला लावलेल्या पुस्तकांवर अवलंबून न राहता आपण अधिक वाचन करायला हवे होते.

वसुमती धुरू

Expressindia | The Indian Express | The Financial Express | City Newslines | Screen | Kashmir Live | Express Computer
| Network Magazine India | eBusiness Traveller | ExpressPharma | Express Hospitality | Express Textile | Express TravelWorld
| Express Healthcare Mgmt.